# - प्रेस नोट -

दि. ३०/०५/२०२६

## आरसीएफ पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. २८/०५/२०२६ रोजी १४.०० वा. ते २१.०० वा. च्या दरम्यान फिर्यादी महिला वय -२५ वर्षे, धंदा- गृहिणी, रा.चेंबुर, मुंबई यांचा पती अटक आरोपी पुरुष वय-३० वर्षे याने फिर्यादी यांचे घरी शिवीगाळ करून हाताने, पायाने व पट्टयाने मारहाण करून त्यांना तलवारीने मारण्याची व ॲसीड फेकण्याची धमकी देवून तसेच फिर्यादीच्या मुलाला तसेच आई-वडीलांना जीवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादी यांना घरामध्ये कोंडुन ठेवले.फिर्यादी हया त्यांच्या घरातून पळुन आल्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी यांचे वडील व भाऊ यांच्याशी भांडण करून त्यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण केली तसेच फिर्यादीची वहीणी ही भांडण सोडविण्यासाठी आली असता फिर्यादीच्या पतीने तिच्या पोटामध्ये लाथ मारली. तसेच धमकी व शिवीगाळ करून त्यांच्या हातामधील चाकूने फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीवर वार करून हाताला दुखापत केली म्हणुन दि. २९/०५/२०२६ रोजी गु. र.क्र. २८२/२६, कलम १०९,१२७ (२),११५(२),३५२, ३५१ (२), ३५१ (३), बीएनएस २०२३, सह कलम १४२,३७(१)(ए),१३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.